N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** मिरज ग्रामीण

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0345 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 03/07/2025 22:40

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिनांक पासून):** 03/07/2025
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 03/07/2025
   **Time From (वेळेपासून):** 13:01 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 13:11 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 03/07/2025 **Time (वेळ):** 21:58 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 043
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 03/07/2025 21:58 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 30 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तलाठी कार्यालय बेळंकीचे समोर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): वैभव तात्यासो जाधव

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1993

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कदमवाडी पो बेळंकी,मिरज ग्रामीण ,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कदमवाडी पो बेळंकी,मिरज ग्रामीण ,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9637163442

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विद्यासागर सदाशिव चव्हाण | | | 1. रघुकुल अपार्टमेंट, ब्राम्हणपुर, मिरज,मिरज ग्रामीण ,सांगली, महाराष्ट्र,भारत |
| 2 | राजाराम धनपाल वाघमारे | | | 1. बौद्ध मंदीरा जवळ, ,बेळंकी, मिरज ग्रामीण ,सांगली,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):



Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 2,500/ रु. 500 रुपये दराच्या 5 चलनी नोटा | 2,500.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):**

2,500.00

11.**Inquest Report / U.D. case No., If any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

वर्दी जबाब दि. 03.07.2025

मी श्री.वैभव तात्यासो जाधव, वय 32 वर्ष, व्यवसाय:- इलेक्ट्रीकल इंजिनिअर, शिक्षण :- बी. ई. रा. मु. कदमवाडी पो. बेळंकी, ता.मिरज जि. सांगली. मो.नं. 9637163442

मी वरील गावचा रहिवाशी आहे. माझा मोठा भाऊ संजय तात्यासो जाधव हा गलाई व्यवसायीक असून तो व्यवसायाचे निमीत्ताने बैतुल मध्यप्रदेश येथे राहणेस आहे. माझा मोठा भाऊ संजय जाधव यांनी दि.16.06.2025 रोजी बेळंकी गावातील गट नं. 1170/ब मधील प्लॉट नं.9 क्षेत्र 168.30 चौ.मी. प्लॉट हा हणमंतराव वसंतराव गायकवाड, रा. संतोषवाडी पो.बेळंकी यांचेकडून खरेदीपत्राव्दारे खरेदी केला आहे. त्यानंतर माझा भाऊ संजय याने दि.17.06.2025 रोजी सदर जमिनीची नोंद 7/12 सदरी होणेसाठी अर्ज व कागदपत्रे ही तलाठी कार्यालयात कोतवाल श्री.राजाराम वाघमारे यांचेकडे दिली होती. त्यानंतर दि.18.06.2025 रोजी माझा भाऊ हा त्याचे गलाई व्यवसाया निमीत्त बैतुल मध्यप्रदेश येथे गेला होता. त्यावेळी त्याने मला त्याने खरेदी केलेल्या जमिनीची नोंद 7/12 होणेसाठी तलाठी कार्यालय बेळंकी येथे जावून पाठपुरावा करणेस सांगितले होते.

दि. 01.07.2025 रोजी ग्रामपंचायत कार्यालय बेळंकी येथे गावातील नागरिकांचे विविध दाखले देणेकामी शिबीर आयोजित होते. त्यावेळी मी दुपारी 12.00 वा चे सुमारास सदर ठिकाणी जावून कोतवाल श्री. राजाराम वाघमारे यांची भेट घेवून आमचे जमिनीचे नोंदी संदर्भात चर्चा केली. त्यावेळी कोतवाल श्री. राजाराम वाघमारे याने आमचे जमिनीची नोंद तलाठी श्री.चव्हाण यांना सांगून मंजूर करण्यासाठी स्वत: करीता व तलाठी श्री.चव्हाण यांचेकरीता माझ्याकडे फी स्वरूपात 2,500/- रूपये मागणी केली. त्यावेळी मी त्यांना माझी नोंद घालून देणेची विनंती केली असता 2,500/- रूपये दिल्याशिवाय नोंद घालून देणार नसल्याचे सांगितले. त्यानंतर मी माहिती घेतली असता अशा कोणत्याही प्रकारची फी खरेदी दस्ताची नोंद 7/12 सदरी घालण्याकरीता घेतली जात नसल्याचे मला समजले. त्यानंतर सदरची रक्कम ही लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाली.

त्यानंतर मी त्याचदिवशी माझा मोठा भाऊ संजय यास संध्याकाळी 09.51 वा चे सुमारास फोन करून कोतवाल श्री. वाघमारे हे माझ्याकडे नोंद घालणेसाठी स्वत:करीता व तलाठी श्री.चव्हाण यांचेकरीता 2,500/- रूपये मागणी करीत असल्याचे सांगितले. त्यावेळी आमचेमध्ये कोतवाल श्री.वाघमारे व तलाठी श्री. चव्हाण यांचेविरूध्द लाच मागणीची तक्रार अँन्टी करप्शन कार्यालय सांगली येथे देणेचे ठरले.

मी कोतवाल श्री. राजाराम वाघमारे व तलाठी श्री.चव्हाण यांना 2,500/- रूपये दिले नाहीतर ते माझा भाऊ संजय जाधव याने खरेदी केलेल्या जमिनीची नोंद 7/12 सदरी घालणार नाहीत याची मला खात्री आहे. मला तलाठी श्री.चव्हाण व कोतवाल श्री. वाघमारे यांना लाच देण्याची माझी इच्छा नसल्याने मी दि.02.07.2025 रोजी 12.00 वा चे सुमारास माझा नातेवाईक श्री. किरण जगताप यांचे मोबाईल नं.8600482098 वरून पोलीस उपअधीक्षक श्री.अनिल कटके यांना कॉल केला होता. त्यावेळी पोलीस उपअधीक्षक श्री.अनिल कटके माझा नातेवाईक श्री. किरण जगताप यांचे मोबाईलवर 12.19 वा संपर्क केला असता मी त्यांना माझी तलाठी श्री. चव्हाण व कोतवाल श्री. वाघमारे यांचेविरूध्द लाच मागणीची तक्रार कळवून माझी तक्रार बेळंकी येथे येवून घेणेची विनंती केली. त्यावेळी कटके साहेब यांनी मला ते पथकासह बेळंकी येथे आलेनंतर संपर्क करीत असल्याचा सुचना दिल्या.

त्यानंतर 15.00 चे सुमारास कटके साहेबांनी मला संपर्क करून बेळंकी गावाचे अलीकडील हॉटेल देवा येथे



Scanned with OKEN Scanner

येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी माझेकडील हिरो होंडा एसएस मो.सा. क्र एमएच 12 एएम 1119 वरून पोलीस उप अधीक्षक श्री. कटके साहेब यांची भेट घेतली. त्यावेळी कटके साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी त्यांचेकडील शासकीय वाहनामध्ये बसलो. त्यावेळी कटके साहेब यांनी मला पोलीस निरीक्षक श्री.विनायक भिलारे यांची ओळख करून देवून पुढील कारवाई भिलारे साहेब करतील असे सांगितले.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.भिलारे साहेब यांनी मला दोन्ही पंचांची व सापळा पथकातील अंमलदार पोना/चौगुले, व पोकॉ/पाटील यांची ओळख करून दिली.

त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला ब्युरोच्या कार्यप्रणालीची माहिती देवून मला लाच मागणीचा तक्रारी अर्ज देण्यास सांगितला. त्याप्रमाणे मी माझा तलाठी श्री. चव्हाण व कोतवाल श्री. वाघमारे यांचेविरूध्दचा लाच मागणीचा हस्तलिखीत तक्रारी अर्ज समक्ष हजर केला. मी दिले तक्रारी अर्जावर भिलारे साहेब यांनी वाचून सही केली.

त्यानंतर भिलारे साहेब यांनी सदर कारवाईसाठी पंच नं. 1 म्हणून श्री. प्रज्वल दिलीप माळगे यांनी व पंच नं.2 म्हणून श्री. योगेश विलास पाटील यांनी काम करण्याचे निश्चित केले. त्यानंतर भिलारे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझी तक्रार दोन्ही पंचा समक्ष कथन केली व माझा तक्रारी अर्ज वाचण्यास दिला. पंचांनी तक्रारी अर्ज वाचून मी सांगितलेली तक्रार व तक्रारी अर्जातील मजकूर एकच असल्याचे खात्री झालेनंतर तक्रारी अर्जावर सहया केल्या.

त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंच नं.1 प्रज्वल माळगे यांना तलाठी श्री. चव्हाण व कोतवाल श्री. वाघमारे, यांचेकडे तलाठी कार्यालय, बेळंकी येथे पाठवून त्यांचेकडे पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंच नं.1 प्रज्वल माळगे यांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डरचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. त्यानंतर भिलारे साहेब यांनी रेकॉर्डरमध्ये नविन मेमरीकार्ड घालून डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 15.36 वा सुरू करून रेकॉर्डरला असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच नं.1 माळगे असे माझेकडील मोटारसायकल वरून रवाना होवून तलाठी कार्यालय बेळंकी येथे दाखल झालो. त्यावेळी मी तलाठी श्री.चव्हाण यांना कोतवाल श्री.वाघमारे यांचेबाबत विचारणा केली असता त्यांनी कोतवाल बाहेर गेले असून अर्धा तासाने येत असल्याचे सांगितल्याने मी व पंच नं.1 माळगे असे तेथून रवाना होवून भिलारे साहेब यांचे समक्ष हजर झालो. त्यावेळी भिलारे साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 15.42 वाजता काढून घेवून बंद केला. त्यानंतर भिलारे साहेबांनी मला व पंच नं.1 माळगे यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुन झालेल्या संभाषणाची पंचांसमक्ष खात्री केली. झाले एकंदरीत पडताळणी कारवाईमध्ये कोतवाल श्री. वाघमारे हे कार्यालयात हजर नसल्याने त्यांची भेट झाली नसल्याने मी तलाठी श्री. चव्हाण यांचेशी कामासंदर्भात काही एक बोलणे झाले नसल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर भिलारे साहेब यांनी कोतवाल श्री. वाघमारे यांचा ठावठिकाणा निश्चित करण्यासाठी माझे मोबाईलवरून त्यांना फोन करून पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याची माहिती दिली. त्यानंतर भिलारे साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे दोन्ही पंचांसमक्ष मी माझे मोबाईल नंबर 9637163442 वरून कोतवाल श्री. वाघमारे यांचे मोबाईल नंबर 9284200721 वर कॉल करून फोन स्पिकर मोडवर घेतला. त्यावेळी कोतवाल श्री. वाघमारे यांनी माझा कॉल रिसीव्ह केल्यानंतर भिलारे साहेब यांनी लागलीच डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 15.47 वाजता सुरू करून माझे समोर धरला. त्यावेळी मी कोतवाल श्री. वाघमारे यांना "ऑफीसला आलो होतो, कुठ गेलाय काय? असे विचारले असता कोतवाल यांनी मला "आलोय की ऑफीसात आत्ता" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "आलाय काय...बर आलो आलो" असे म्हणून फोन कट केला. लागलीच भिलारे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद केला. झाले एकंदरीत पडताळणी कारवाईमध्ये कोतवाल श्री. वाघमारे, हे तलाठी कार्यालय बेळंकी येथे आले असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंच नं.1 माळगे यांना कोतवाल श्री. वाघमारे व तलाठी श्री. चव्हाण यांचेकडे तलाठी कार्यालय बेळंकी येथे पाठवून त्यांचेकडे पडताळणी करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व व पंच नं.1 प्रज्वल माळगे यांना पडताळणी कारवाई कामी दिले सुचनांची उजळणी करून दिली. त्यानंतर भिलारे साहेब डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 15.53 वाजता सुरु करुन माझे गळ्यात लेसच्या सहाय्याने अडकवून मला व पंच नं.1 माळगे यांना रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच नं.1 माळगे असे माझेकडील हिरो होंडा एसएस मो.सा. क्र एमएच 12 एएम 1119 वरून रवाना होवून तलाठी कार्यालय बेळंकी येथे दाखल झालो. त्यावेळी मी व पंच नं.1 माळगे यांनी कोतवाल श्री. वाघमारे यांची भेट घेवून त्यांचेशी आमचे नोंदी संदर्भात चर्चा केली. त्यावेळी कोतवाल याने मला आमचे नोंदीला आठ दहा दिवस लागणार असल्याचे सांगून अडीच हजारचा पायंडा पडला असल्याचे सांगितले. त्यावर मी त्यांना "आडीच हजार म्हणतोय होय" असे विचारले असता कोतवाल वाघमारे यांनी "आडीच हजार सांगितलेत त्यान, त्या मानान काय बोलायच न्हाय मग" असे म्हणून माझ्याकडे 2,500/- रूपये लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना "तलाठी साहेबांच पण हायत ना त्यात?" असे



Scanned with OKEN Scanner

विचारले असता कोतवाल वाघमारे यांनी "त्यातच द्यायला लागतय रे ते" असे म्हणून तलाठी यांचेकरीता देखील पैसे द्यावे लागत असल्याचे सांगितले. त्यानंतर मी कोतवाल यांना कार्यालयात आतमध्ये बसले इसमाबाबत विचारणा केली असता कोतवाल यांनी " ते सर्कल असत्यात दहा गावचे अधिकारी त्यांच्या वरचे अधिकारी असत्यात" असे म्हणाले. त्यावेळी तलाठी चव्हाण हे त्यांचे दुस-या कामामध्ये व्यस्थ असल्याने त्यांचेशी माझे बोलणे झालेले नाही.

त्यानंतर माझेत व कोतवाल वाघमारे यांचेतील चर्चा झालेनंतर मी व पंच नं.1 मळगे असे तेथून रवाना होवून भिलारे साहेब यांचे समक्ष हजर झालो. त्यावेळी भिलारे साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो 16.03 वाजता बंद करुन त्यांचे ताबेत घेतला. त्यानंतर भिलारे साहेबांनी मला व पंच नं.1 माळगे यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुन झालेल्या संभाषणाची पंचांसमक्ष खात्री केली.

झाले एकंदरीत पडताळणी कारवाईमध्ये कोतवाल श्री. वाघमारे यांनी माझा भाऊ संजय जाधव यांनी खरेदी केलेल्या जमिनीची नोंद ही तलाठी श्री. चव्हाण यांना सांगून 7/12 सदरी धरून 7/12 उतारा देणेसाठी माझेकडे स्वत: करीता व तलाठी श्री. चव्हाण यांचेकरीता 2,500/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर भिलारे साहेब यांनी कोतवाल श्री. वाघमारे यांचे लाच मागणीमध्ये तलाठी श्री. चव्हाण यांचा सहभाग निश्चित करण्यासाठी त्यांचेकडे पुन्हा पडताळणी करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंच नं.1 प्रज्वल माळगे यांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 16.43 वा सुरू करून रेकॉर्डरला असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच नं.1 माळगे असे माझेकडील मोटारसायकल वरून रवाना होवून तलाठी कार्यालय बेळंकी येथे दाखल झालो. त्यावेळी मी व पंच नं.1 माळगे असे तलाठी श्री. चव्हाण यांचेजवळ जावून त्यांना आणीखन डॉक्युमेंट लागणार हायत का याबाबत विचारणा कली त्यावेळी कोतवाल श्री.वाघमारे हे माझेजवळ येवून "काय लागत न्हाय काय...आता नोंद झाल्या रे तुझी" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "न्हाय आण्णासाहेबांना विचारून ये म्हणला आणि काय डॉक्युमेंट लागणार हायत का, उद्या जाणार हाय ओ मी....उद्या सांगितल्याप्रमाणे ते आडीच हजार रूपये, तुम्ही हिथ नसतायसा" असे म्हणालो. त्यावर कोतवाल यांनी "अरे येवून गेलतो बाहेर काम होत म्हणून गेलतो" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "आण्णासाहेब होत आण्णासाहेबांकड देवू काय म्हटल" असे तलाठी श्री. चव्हाण यांना उद्देशुन म्हणालो. त्यावेळी कोतवाल वाघमारे यांनी "उद्या बघु ये...आम्ही कुठ जातोय" असे म्हणाले. त्यावर मी तलाठी चव्हाण यांना उद्देशून "आजुन काय डॉक्युमेंट लागत न्हायत ना आण्णासाहेब...... उद्या सकाळी तुम्ही नसला तर आण्णासाहेब तुमच्याकड देवु का मग?" अशी विचारणा केली असता तलाठी चव्हाण यांनी त्यांची मान होकारार्थी हालवली. त्यावर कोतवाल वाघमारे यांनी "असतोय मी, ये आण्णासाहेब कुठ जात्याती" असे म्हणाले. त्यावर मी त्या दोघांना "न्हाय तुम्ही नसला तर हयांच्याकड देतो....आण्णासाहेब तुमच्याकडे देतो" असे म्हणालो असता तलाठी चव्हाण यांनी पुन्हा पंचांसमक्ष होकारार्थी मान डोलावली व कोतवाल श्री.वाघमारे यांनी "हा" म्हणालेने मी व पंच नं.1 माळगे असे तलाठी कार्यालय बेळंकी येथून रवाना होवून भिलारे साहेब यांचे समक्ष हजर झालो. त्यावेळी भिलारे साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 16.57 वाजता काढून घेवून बंद करून त्यांचे ताबेत घेतला. त्यानंतर भिलारे साहेबांनी मला व पंच नं.1 माळगे यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुन झालेल्या संभाषणाची पंचांसमक्ष खात्री केली.

झाले एकंदरीत पडताळणी कारवाईमध्ये, कोतवाल श्री. वाघमारे यांनी पंचांसमक्ष मला लाच रक्कम उदईक रोजी घेवून येण्यास सांगून आमेचतील चर्चेवेळी तलाठी श्री. चव्हाण यांनी होकारार्थी मान डोलावून मला उदईक रोजी लाच रक्कम घेवून येण्यास सांगून प्रोत्साहन दिले असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर भिलारे साहेब यांनी तलाठी श्री. चव्हाण व कोतवाल श्री. वाघमारे यांचेविरूध्द दि.03.07.2025 रोजी सापळा कारवाई करण्याचे निश्चित केले. त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला कोतवाल यांनी लाच मागणी केलेप्रमाणे 2,500/- रूपये घेवून सकाळी 11.00 वा चे सुमारास हॉटेल देवा बेळंकी येथे हजर राहणेच्या तसेच झाले कारवाईबाबत गोपनियता राखणेच्या सुचना देवून जाणेस सांगितले. त्याप्रमाणे मी निघून गेलो.

दि.03.07.2025 रोजी भिलारे साहेब यांनी मी दिले सुचनेप्रमाणे मी 12.30 वा चे सुमारास बेळंकी गावाजवळील हॉटेल देवा येथे भिलारे साहेब व सापळा पथक यांची घेतली. त्यानंतर भिलारे साहेबांनी तलाठी श्री. चव्हाण व कोतवाल श्री. वाघमारे यांचेविरूध्द तलाठी कार्यालय बेळंकी येथे सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला कोतवाल श्री. वाघमारे यांनी मागितल्याप्रमाणे त्यांना द्यावी लागणारी लाच रक्कम 2,500/- रूपये हजर करण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी 500/- रूपये दराच्या 5 नोटा असे 2,500/- रूपये भिलारे साहेब व दोन्ही पंचांसमक्ष हजर केले. त्यावेळी भिलारे साहेब यांनी सापळा पथकातील कर्मचारी



Scanned with OKEN Scanner

यांचेकरवी लाच रक्कमेच्या नोटांचे नंबर एका को-या कागदावर लिहून घेतल्या. त्यानंतर भिलारे साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडरचा गुणधर्म, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती देवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली.

त्यानंतर मी हजर केलेल्या नोटांना पथकातील अंमलदार बडणीकर यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन 2,500/- रूपयांचा नोटांची घडी करून माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिश्यामध्ये ठेवली. व भिलारे साहेबांनी सापळापुर्व कारवाई करून मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर भिलारे साहेब यांनी पथकातील अंमलदार बडणीकर यांना हॉटेल देवा येथे थांबणेचे सुचना देवून त्यांना सापळा कारवाईतून वगळण्यात आले.

त्यानंतर भिलारे साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 13.01 वाजता सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवून माझे शर्टच्या आतमध्ये सोडला. त्यानंतर मी व पंच नं.1 प्रज्वल माळगे असे माझेकडील हिरो होंडा एसएस मो.सा. क्र एमएच 12 एएम 1119 वरून रवाना झालो. माझे पाठोपाठ भिलारे साहेब व सापळा पथक हे त्यांचेकडील वाहनाने रवाना झाले. मी माझे मोटार सायकल बेळंकी गावातून तलाठी कार्यालय समोर जावून पार्क केली. त्यावेळी तलाठी चव्हाण हे कार्यालयाचे बाहेर काही लोकांशी चर्चा करीत उभे असलेचे दिसले. त्यानंतर मी व पंच नं.1 माळगे असे तलाठी श्री. चव्हाण यांनी भेट घेवून "आण्णासाहेब नमस्कार.... ते राजु दादान ते आपल्या नोंदींच बोललेल न्हायत का.... कालच" असे म्हणालो. त्यावर तलाठी चव्हाण यांनी "हा हा....... घातल्या आता नोंद" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "ते राजु दादा बोललेले आडीच हजार रूपये देवु का तुमच्याकडे?" असे विचारले असता तलाठी चव्हाण यांनी "दे" असे म्हणून माझेकडे लाचेची मागणी केल्याने मी माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिश्यामध्ये अॅथ्रॉसिन पावडर लावून ठेवलेली लाच रक्कम माझे उजवे हाताने बाहेर काढून तलाठी श्री. चव्हाण यांचेसमोर धरून "मोजून घ्या" असे म्हणालो असता. तलाठी चव्हाण यांनी माझेकडून लाच रक्कम 2,500/- रूपये त्यांचे उजवे हाताने स्विकारून मला "हायत ना .... बोलतो राजुला झाल असल तुमच म्हणत्यात घातल्या बहुतेक तारीख भरल्या मी पाठीमागची" असे म्हणून लाच रक्कम त्यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिश्यामध्ये ठेवली. त्यावर मी पुन्हा त्यांना "ते आडीच हजार हायत मोजुन घ्या" असे म्हणालो असता तलाठी चव्हाण यांनी "चालतय काय आडचण न्हाय" असे म्हणाले. त्यानंतर माझेत व तलाठी चव्हाण यांचेमध्ये फेरफार नोंदी संदर्भात चर्चा झाली. त्यावेळी मी त्यांना कोतवाल राजु यांचेबाबत विचारणा केली असता त्यांनी कोतवाल हे मिरजला जावून येतो म्हणालेचे सांगितले. त्यावर मी त्यांना "पैसे दिलेत म्हणुन सांगा आडीच हजार रूपये" असे म्हणालो असता तलाठी चव्हाण यांनी "हा .. सांगतो की" असे म्हणून तलाठी त्यांचे कार्यालयामध्ये गेले. त्यानंतर मी बाजुस येवून माझे डावे हाताने पॅन्टचे डावे खिश्यातील हातरूमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजित इशारा केला. लागलीच सापळा पथकातील कर्मचारी पोना/चौगुले यांनी माझेजवळ येवून माझेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर 13.11 काढून घेवून बंद करून त्यांचे ताबेत घेवून मला बाजूला थांबण्यास सांगितले. त्यानंतर भिलारे साहेब व सापळा पथकाने तलाठी श्री.चव्हाण यांना ताबेत घेतले. तसेच त्यांचेकडील 2,500/-रूपये लाच रक्कम पंचासमक्ष ताब्यात घेतली. त्यानंतर भिलारे साहेब यांनी कोतवाल श्री. वाघमारे यांना देखील ताबेत घेतले.

त्यानंतर भिलारे साहेब यांनी सदर ठिकाणी सापळा कारवाई मधील प्राथमिक तपासण्या पुर्ण केल्या व सदर ठिकाणी पंचनामा करणेच गैरसोईचे असलेने पुढील सविस्तर सापळापूर्व, सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही अँन्टी करप्शन ब्युरो, कार्यालय सांगली येथे पूर्ण करण्यात आली.

तरी दि. 02.07.2025 रोजीचे 15.53 वा ते 16.03 वा चे पडताळणी कारवाई दरम्यान कोतवाल श्री. राजाराम वाघमारे, यांनी पंचासमक्ष तलाठी कार्यालय बेळंकी येथे आपले स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने माझा मोठा भाऊ संजय जाधव यांनी खरेदी केलेल्या जमिनीची नोंद तलाठी श्री. चव्हाण यांना सांगून मंजूर करण्यासाठी स्वतःकरीता व तलाठी चव्हाण यांचेकरीता माझेकडे 2,500/- रूपये लाचेची मागणी केली. तसेच त्याच दिवशीचे 16.43 वा. ते 16.57 वा. चे पडताळणी कारवाई दरम्यान कोतवाल श्री. राजाराम वाघमारे यांनी मला लाच रक्कम उदईक दि.03.07.2025 रोजी घेवून येण्यास सांगून आमेचतील चर्चेवेळी तलाठी श्री. चव्हाण यांनी प्रत्यक्ष सहभाग घेवून पंचासमक्ष होकारार्थी मान डोलावून मला उदईक रोजी लाच रक्कम घेवून येण्यास सांगून प्रोत्साहन दिले आहे. तसेच दि.03.07.2025 रोजीचे 13.01 वा. ते 13.11 वा चे सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक श्री.विद्यासागर चव्हाण, तलाठी बेळंकी यांनी आपले स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने तलाठी कार्यालय बेळंकी कार्यालयाचे समोरील माझ्याकडून 2,500/- रूपये लाच रक्कम स्विकारली आहे.

म्हणून माझी लोकसेवक 1) आरोपी लोकसेवक 1) श्री. विद्यासागर सदाशिव चव्हाण, वय 50 वर्षे, व्यवसाय - नोकरी - तलाठी बेळंकी (ग्राम महसुल अधिकारी) रा. फ्लॅट नं. 104, रघुकुल अपार्टमेंट, ब्राम्हणपुरी, मिरज, ता.



Scanned with OKEN Scanner

मिरज, जि. सांगली, वर्ग-3, आरोपी लोकसेवक 2) श्री.राजाराम धनपाल वाघमारे, वय-53 वर्षे, व्यवसाय - नोकरी - कोतवाल बेळंकी (महसुल सेवक) रा. 69, बौद्ध मंदीरा जवळ, बेळंकी, ता. मिरज, जि. सांगली वर्ग-4 यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा माझे समक्ष संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष — हा दिला वर्दीजबाब,

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Ajit Pandurang Sid(I (Inspector)) / 1000359APSM8001K **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

पोलीस स्टेशन ऑफीसर
मिरज ग्रामीण पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**



Scanned with OKEN Scanner